**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६६ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २१३** **दिनांक – २८/१०/२०२५**
**विभाग – सार्व.बांध विभाग**

---

प्रस्तावाचा विषय – साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना ( सन २०२५ – २६ ) अंतर्गत प्रस्तावित विकास कामास प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत.

--**--

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना (सन २०२५-२६) अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस रक्कम रु.४,७५,५५,२४४/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. मा.आ.श्री. संग्राम पार्वती अरुणकाका जगताप, (नगर शहर) यांनी १२ कामे सदर योजनेतून मंजुरीसाठी सादर करणेबाबत मा. पालकमंत्री महोदय, अहिल्यानगर जिल्हा, यांना विनंती पत्र दिले असून त्याची प्रत इकडेस सादर केली आहे.

प्रस्तावित १२ कामांची मनपा स्तरावरील स्थळ पाहणी समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन एक काम वगळता ११ कामे प्रस्तावित करणेस शिफारस केलेली आहे, त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून रक्कम रु.३,३२,६२,०८३/- इतका खर्च अपेक्षित आहे. प्रथम टप्प्यात सदर रकमेचा प्रस्ताव सादर करणे योग्य आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रवर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमाक ०९ मधील सिध्दार्थ नगर अंतर्गत रस्ते व ड्रेनेज विकसीत करणे | अनु.जाती (महिला) | १७९११८२ |
| २ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ०९ मधील सिद्धार्थनगर नकाल घर ते डॉक्टर घोरपडे येथील रस्ता कॉक्रिटीकरण करणे (लक्ष्मी प्रोविजन स्टोअर्स मनोज सुडके घर ते गौतम अपार्टमेंट ते करंदीकर घर बालिकाश्रम रोड | अनु.जाती (महिला) | ३४९६८६९ |
| ३ | अहिल्यानगर महानगरपालिकाहीशी प्रभाग क्रमांक १४ मधील केदार वस्ती परिसर व शांती नगर सारसनगर ते जमदाडे घर से पोपट थोरात घर ते रमेश गायकवाड घर ते शकुंतला गायकवाड घर ते सचिन दळवी घर ते पवन साबळे घर ड्रेनेज लाईन व कॉक्रिटीकरण करणे, | ५०% पेक्षा जास्त | ५४९७७११ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील सारसनगर येथे शांती नगर येथे बौद्ध विहार समाजमंदिर मध्य सभा मंडप बांधणे | ५०% पेक्षा जास्त | ३४९०००८ |
| ५ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील केदार वस्ती, शांतीनगर मुख्य रस्त्यावर पथदिवे बसवणे | ५०% पेक्षा जास्त | ५००००२७ |
| ६ | अहिल्यानगर महानगरपालिका हदीतील प्रभाग क्रमांक ०९ मधील करंदीकर हॉस्पिटल जवळील ओपनस्पेस व सारडा कॉलेज मागील तालिम विकसीत करणे व ओपन जीम करणे | अनु. जाती ( महिला) | ९९९३०७ |
| ७ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ०७ मधील नागापुर गावठाण येथील भाकरेताई घर ते गायकवाड घर ते भोरवस्तीपर्यंत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे | अनु. जाती ( महिला) | १९९९४७३ |
| ८ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ०७ मधील बोल्हेगाव येथील आंबेडकर चौक येथे कॉंक्रिटीकरण करणे व जोडरस्ते विकसीत करणे, | अनु. जाती ( महिला) | २९९६९२१ |
| ९ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सिद्धीबाग येथील बुद्ध पुतळयाजवळ समाजमंदिर बांधणे व परिसर विकसीत करणे. | अनु. जाती ( महिला) | ३४९२३१४ |
| १० | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०७ मध्ये स्मिता भाकरे घर ते अशोक चांदणे घर ते अरुण गायकवाड घर ते यमुना पवार घर ते सुभाष घोडेवार घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | अनु. जाती ( महिला) | ३४९९९९१ |
| ११ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०८ मधील वारुळाचा मारुती जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहती अंतर्गत भूमिगत गटार करणे. | अनु. जाती ( महिला) | ९९९२८० |
| | | **एकुण =** | **३,३२,६२,०८३/-** |

शासन निर्णयानुसार विकास कामे घेणेबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे

बाब क्र. ४ :- योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात नमुद केलेली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील.

बाब क्र.५ :- शहरातील अनुसुचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसुचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने ( उतरत्या क्रमाने) या योजनेअंतर्गतची कामे हाती घेण्यात यावीत.

बाब क्र. ६अ :- योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे रस्ते, पोच रस्ते, जोड रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंट्रीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत वस्त्यांकरीता कच्चे रस्ते), नाले बांधकाम, नाल्यावर फरशी बांधणे, विहीर दुरुस्ती तसेच उघड्या विहिरींवर कठडे बांधणे, नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर संरक्षक भिंती तसेच कठडे बांधणे, छोटे पुल, पिण्याच्या पाण्यासाठी, सोई-सुविधा (हापसा, पाण्याची टाकी) सार्वजनिक उपयोगासाठी मुताऱ्या व शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, वगीचे, बगीच्यामध्ये पक्क्या स्वरुपाचे बसावयाचे खेळाचे साहित्य, समाज मंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतीक केंद्र, दुकाने, स्मशानभुमीचा विकास ही व या सारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

बाब क्र. ६ ब :- या योजनेअंतर्गत कामे हाती घेतांना " पायाभुत सेवा सुविधाच्या " कामांचा प्राधान्य असणे आवश्यक राहील.

बाब क्र. ६ क :- शहराच्या मंजुर विकास योजनेतील प्रस्तावानुसार अनुज्ञेय असलेली विकास योजनेअंतर्गत कामे हाती घेता येतील.

सदर योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १अ, ७अ, ८अ, ९अ, ११अ, १५अ, १६अ व १७अ हे प्रभाग अनुसुचित जाती प्रवर्गातील असुन याव्यतिरिक्त 50% पेक्षा जास्त लोकसंख्या असलेले प्रभागामध्ये आवश्यकतेनुसार कामे सुचविता येतील. सदर प्रस्तावित कामाबाबत पाहणी समितीचा अहवाल सोबत जोडला आहे

तरी उक्त योजनेअंतर्गत प्रथम टप्प्यात वर नमुद विकास कामे करणेसाठी रक्कम रु. **३,३२,६२,०८३/-** (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी बत्तीस लक्ष बासष्टहजार त्र्याएंशी मात्र) चा खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेकामी मा. जिल्हाधिकारी, (न.पा. शाखा) अहिल्यानगर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |